सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
राष्ट्रीय छात्र सेना
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

लेफ्ट. आशिष सांगळे
संपर्क : +९१७०२८९९११८१
: ०२०–२५६२२६८३


**संदर्भ क्र. विविमं/२०२५-२६/४३९** **दि. २२/१२/२०२५**

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित**
**सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,**
**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.**

**विषय : एकदिवशीय एस.एस.बी. प्रशिक्षण कार्यशाळेबाबत.**

**महोदय/महोदया,**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र व विस्तार विभाग आणि विद्यार्थी विकास मंडळास दिनांक २९ सप्टेंबर, २०२२ पासून राष्ट्रीय छात्र सेना सब युनिटसाठी मान्यता मिळाली असून सदर युनिट 3 MAH Armd Sqn, Pune युनिटशी संलग्न आहे. विद्यार्थ्यांवर एकता व स्वयंशिस्त तसेच श्रम-संस्कार, कौशल्य-संस्कार, सर्वांगीण चारित्र्य विकास देखिल व्हावेत या हेतूने विद्यार्थ्यांना साहयभूत ठरणाऱ्या या उपक्रमात विद्यार्थ्यांचा भरपूर उस्फूर्त प्रतिसाद व सहभाग लाभत असतो.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय छात्र सेना सुकाणू समितीच्या बैठकीत पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमधील राष्ट्रीय छात्र सेना कॅडेट यांच्याकरिता एकदिवशीय एस.एस.बी. प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्याबाबत सूचित करण्यात आले.

**विभागनिहाय प्रस्तावित महाविद्यालयाचा तपशील :**

| **विभाग** | **महाविद्यालयाचे नाव** |
|---|---|
| पुणे शहर | पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, अण्णासाहेब मगर महाविद्यालय, हडपसर पुणे. |
| पुणे ग्रामीण | राष्ट्रीय छात्र सेना युनिट, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. |
| अहिल्यानगर | डॉ.भास्कर पांडुरंग हिवाळे एज्युकेशन सोसायटीचे, अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर. |
| नाशिक | मध्यवती हिंदू सैनिकी शिक्षण मंडळाचे, भोसला मिलिटरी कॉलेज, नाशिक. |

या एकदिवशीय एस.एस.बी. प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन माहे जानेवारी/फेब्रुवारी, २०२६ मध्ये प्रस्तावित असून याबाबत आपल्याला येणाऱ्या कालावधीमध्ये स्वतंत्र पत्राद्वारे कळवण्यात येईल. तरी, आपल्या महाविद्यालय मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये असणाऱ्या राष्ट्रीय छात्र सेना तुकडीमधील एस.एस.बी. प्रशिक्षण घेणारे/तयारी करणारे/इच्छुक/पात्र असलेले २ एस.डी Male (SD) कॅडेट आणि २ एस.डब्ल्यू Female (SW) कॅडेट यांना एकदिवशीय एस.एस.बी. प्रशिक्षण कार्यशाळेकरीता **(www.Unipune.ac.in - BOD - BOD online - Login - User Name & Password - Online Services – NCC – SSB Training Workshop Registration)** येथे ऑनलाईन (Online) पद्धतीने दि. २९ डिसेंबर, २०२५ दु. ०३.०० वाजेपर्यंत भरण्याबाबत संबंधितांना सूचित करावे.

कळावे, ही विनंती.

**(ले. आशिष सांगळे),**
सहयोगी एनसीसी अधिकारी,
राष्ट्रीय छात्र सेना

**(डॉ. सविता कुलकर्णी),**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ